मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » बुधवार, दि. 26 मार्च 2025 | पान- 1

# टपरी चालक ते विधानसभा उपाध्यक्ष

## पिंपरी- चिंचवड शहराला मंत्रीपदाचा दर्जा असलेले विधानसभेचे उपाध्यक्षपद मिळणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थापनेपासून मंत्रिपदाची प्रतीक्षा असलेल्या पिंपरी- चिंचवड शहराला मंत्रीपदाचा दर्जा असलेले विधानसभेचे उपाध्यक्षपद मिळणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी उपाध्यक्षदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महायुतीकडे बहुमत असल्याने बनसोडे यांची निवड निश्चित मानली जात आहे. शहराला पहिल्यांदाच विधानसभेचे उपाध्यक्षपद मिळाले आहे. अजित पवार यांनी मंत्रीपदाऐवजी एकेकाळी बालेकिल्ला असलेल्या शहरात उपाध्यक्ष पद दिले आहे. तर, टपरी चालक ते विधानसभा उपाध्यक्ष असा आमदार बनसोडे यांचा राजकीय प्रवास आहे.

विधानसभा उपाध्यक्षपदासाठी बुधवारी निवडणूक होणार असून त्यासाठी आज मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया झाली. बुधवारी नवीन उपाध्यक्षांची घोषणा होईल. उपाध्यक्षपद राष्ट्रवादीच्या (अजित पवार) गटाच्या वाट्याला आले आहे. उपाध्यक्षपदासाठी पक्षात माजी मंत्री संजय बनसोडे, राजकुमार बडोले आणि अण्णा बनसोडे या तिघांच्या नावांची चर्चा होती. यापैकी पिंपरीच्या बनसोडे यांना संधी मिळाली आहे.

बनसोडे यांनी महापालिकेत तीन टर्म नगरसेवक म्हणून काम केले आहे. स्थायी समितीचे अध्यक्षपदही भूषविले आहे. २०१४ च्या अपवाद वगळता पिंपरी मतदारसंघाच्या निर्मितीपासून ते विधानसभेत प्रतिनिधित्व करत आहेत. अण्णा बनसोडे यांनी पिंपरी विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडून येण्याचा विक्रम केला आहे. राजकारणात येण्यापूर्वी बनसोडे चिंचवड येथे पान टपरी चालवत होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अतिशय निकटवर्तीय अशी त्यांची ओळख आहे. विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीनंतर पहाटे भाजपसोबत सत्ता स्थापन करताना आणि जुलै २०२३ मध्ये शिवसेना-भाजप सरकारमध्ये सहभागी होताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत ते ठाम राहिले. तिसऱ्यांदा निवडून आल्याने महायुतीच्या सरकारमध्ये मंत्रिपद मिळेल असा त्यांना विश्वास होता. परंतु, भ्रमनिरास झाला. त्यामुळे नाराज झालेले आमदार बनसोडे हे नागपूरमध्ये झालेले हिवाळी अधिवेशन सोडून मतदारसंघात आले होते. आता विधानसभेचे उपाध्यक्षपद देउन अजित पवार यांनी बनसोडे यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

मंत्रिमंडळाच्या शर्यतीत पिंपरी-चिंचवड शहरातील बनसोडे यांच्याबरोबरच तिसऱ्यांदा निवडून आलेले आमदार महेश लांडगे व भाजपचे शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप तसेच विधान परिषद सदस्य अमित गोरखे यांची नावे होती. मात्र, पिंपरी-चिंचवड शहराला ती संधी मिळाली नाही. उपाध्यक्ष पद हे मंत्री दर्जाचे पद असल्याने अप्रत्यक्षपणे मंत्री दर्जाचे पद शहराला मिळाले आहे. पिंपरी-चिंचवड शहर हे औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असून, राजकीयदृष्ट्याही आता या शहराचा प्रभाव वाढताना दिसत आहे.

### मागितले मंत्रीपद मिळाले उपाध्यक्षपद

» औद्योगिकनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील आमदाराला आत्तापर्यंत एकदाही कॅबिनेट अथवा राज्यमंत्रिपद मिळाले नाही. आत्तापर्यंत शहरातील पाच जणांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा असलेले महामंडळ मिळाले, मात्र शहराच्या ४० वर्षाच्या इतिहासात एकदाही कॅबिनेट, राज्यमंत्रिपद मिळाले नाही. मंत्रीपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात असलेले आणि तीनवेळा निवडून आलेले भोसरीचे भाजप आमदार महेश लांडगे आणि पिंपरीचे राष्ट्रवादी (अजित पवार) अण्णा बनसोडे मंत्रिपदासाठी तीव्र इच्छुक होते. परंतु, मंत्रिपदाऐवजी आमदार बनसोडे यांना मंत्रिपदाचा दर्जा असलेले विधानसभेचे उपाध्यक्षपद मिळाले आहे.


# पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांना 'हिंदुकुल' भूषण पुरस्कार जाहीर

## गुरुवारी ग. दि. माडगूळकर सभागृहात हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठान च्या वतीने पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचा रौप्य महोत्सव, शिवजयंती महोत्सव चे औचित्य साधून हिंदू स्वाभिमान दिवसानिमित्त जेष्ठ वक्ते पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांना "हिंदू कुलभूषण" पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, सचिव उत्तम दंडीमे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

गुरुवारी (दि. २७ मार्च) सायंकाळी ५:३० वाजता निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी "सनातन राष्ट्रवाद आणि आजचा युवा" या विषयावर पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ हे व्याख्यान देणार आहेत, तसेच राष्ट्रप्रहरी या रौप्य महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल हे भूषविणार आहेत, अशी माहिती शिवजयंती उत्सवाचे समन्वयक कैलास बारणे व खजिनदार दत्ता सूर्यवंशी यांनी दिली. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये सुहास पोफळे, अतुल आचार्य, कुमार जाधव, रमेश स्वामी, दिलीप कुलकर्णी, दिगंबर रिद्धीवाडे, नामदेव शिंत्रे, विजय गुंजाळ, शिवाजी रेड्डी, ॲड. देवदास शिंदे, मनोज गोबे, मनोज बोरसे आदींनी सहभाग घेतला आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास सोहळ्यास हिंदू बंधू-भगिनींनी भगवे फेटे परिधान करून बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# हिंजवडी आयटी पार्कची ‘बत्ती गुल’!

## हिंजवडी आयटी पार्कमधील वीजपुरवठा गेल्या 15 दिवसांत तीन वेळा खंडित

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होऊ लागला आहे. यामुळे या माहिती तंत्रज्ञान (आयटी) पार्कमधील शेकडो कंपन्यांना फटका बसत आहे. आंबेगावमधील डोंगराळ भागात लागत असलेल्या आगीच्या घटनांमुळे वीजपुरवठा खंडित होत असल्याचे समोर आले आहे.



हिंजवडी आयटी पार्क आणि आजूबाजूच्या परिसरात पिरंगुट-कांदळगाव वीजवाहिनीच्या माध्यमातून वीजपुरवठा केला जातो. ही वाहिनी आंबेगावमधील डोंगराळ भागातून जाते. या भागात अनेक ठिकाणी जंगल असून, तिथे आगीच्या घटना घडत आहे. एखाद्या ठिकाणी आग लागल्यानंतर वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार घडत आहे. गेल्या १५ दिवसांत ३ वेळा अशा घटना घडल्या आहेत. हा डोंगराळ भाग असल्याने त्या ठिकाणी जाऊन वीजपुरवठा सुरळीत करण्यात महापारेषणच्या अधिकाऱ्यांना अधिक वेळ लागत आहे. गेल्या शनिवारीही (ता.२२) याच कारणामुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. तो सुरळीत करण्यास सुमारे पाऊण तासांचा अवधी लागला.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये सुमारे दोनशे आयटी कंपन्या आहेत. याचबरोबर शेकडो लघु व मध्यम उद्योग आहेत. या पार्कमधील वीजपुरवठा गेल्या १५ दिवसांत तीन वेळा खंडित झाला आहे. वीज खंडित झाल्यानंतर कंपन्यांना जनित्रावर काम करावे लागते. यामुळे कंपन्यांच्या खर्चात वाढ होते. हा खर्च विजेच्या खर्चापेक्षा खूप जास्त असतो. त्यामुळे कंपन्यांवर नाहक हा खर्चाचा बोजा पडत आहे. आयटी पार्कमधील लघु व मध्यम उद्योगांना याचा मोठा फटका बसत आहे, अशी प्रतिक्रिया उद्योग क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

### महापारेषणकडून गस्त

» आंबेगावमधील डोंगराळ भागात अनेक जण उन्हाळ्यात गवत पेटवतात. यामुळे आग लागण्याच्या घटना घडतात. वीजवाहिनीच्या जवळ ही आग लागल्यास आगीमुळे निर्माण झालेल्या धुरामुळे विद्युत प्रवाह जमिनीत उतरते. त्यामुळे विद्युत पुरवठा खंडित होतो. अशा घटना टाळण्यासाठी महापारेषणचे कर्मचारी या परिसरात गस्त घालत आहेत. विशेषत: सुट्यांच्या दिवशी या घटना जास्त घडत असल्याने त्यादिवशीही गस्त घालण्यात येत आहे.

“ आंबेगावमधील डोंगराळ भागात आग लागल्यानंतर वीजपुरवठा खंडित होत आहे. त्या भागात जाऊन वीजपुरवठा सुरळीत करण्यास वेळ लागतो. नागरिकांनी गवताला आग न लावल्यास असे प्रकार घडणार नाहीत.

- विठ्ठल भुजबळ, अधीक्षक अभियंता, महापारेषण.

“ हिंजवडी आयटी पार्कमधील पाणीपुरवठा आणि पथदिव्यांची जबाबदारी ‘एमआयडीसी’कडे आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास पाणीपुरवठ्यासाठी जनित्राचा वापर केला जातो. मात्र, वीज नसलेल्या काळात पथदिवे बंद असतात.

- एस. एम. थिगळे, उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)

# दहा हजार इमारतींचा स्वयंपुनर्विकास

## मुंबई प्रमाणे पुण्यातही सोसायटी आणि अपार्टममेंटकडून प्रक्रियेला चालना

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबईप्रमाणे पुण्यातील सोसायट्यांनीही स्वयंपुनर्विकासाला प्राधान्य दिले असून, सुमारे १० हजार सोसायट्या, अपार्टमेंटनी त्यासंबंधीची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू केली आहे. येत्या काळात पुणे शहर आणि जिल्ह्यातील २५ हजार गृहनिर्माण सोसायट्या आणि अपार्टमेंटचा पुनर्विकास अपेक्षित आहे.

‘राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (एनसीडीसी) साखर कारखान्यांना ज्या प्रमाणे कर्ज देते, त्या धर्तीवर गृहनिर्माण सोसायट्यांनाही स्वयंपुनर्विकासासाठी ‘एनसीडीसी’ कडून कर्ज स्वरूपात पैसे उपलब्ध करून दिले जातील. त्यासाठी केंद्रीय स्तरावरून येत्या तीन महिन्यांत ‘एनसीडीसी’च्या उपविधींमध्ये बदल केले जातील,’ अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात रविवारी केली. या पार्श्वभूमीवर शहर आणि जिल्ह्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटचा आढावा महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाकडून ‘लोकसत्ता’ने घेतला. महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन यांनी याबाबत माहिती दिली.



पटवर्धन म्हणाले, ‘पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागात २६ हजार ५०० नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था आणि ४० हजार अपार्टमेंट अशा एकूण ६६ हजार ५०० संस्था आणि अपार्टमेंट आहेत. त्यापैकी ४० टक्के म्हणजे २५ हजार संस्था आणि अपार्टमेंटचा पुनर्विकास अपेक्षित आहे. या २५ हजारांमधील १० हजार गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटनी स्वयंपुनर्विकासाची तयारी दर्शविली आहे.’

स्वयंपुनर्विकास करण्यासाठी इच्छुक सोसायट्यांसाठी राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाने ‘स्वयंपूर्ण विकास योजना’ सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वयंपुनर्विकास करू इच्छिणाऱ्या संस्थांना याअंतर्गत वाजवी दरामध्ये कर्जपुरवठा करण्यात येणार आहे. स्टील, सिमेंट, विद्युत उपकरणे थेट कंपन्यांकडून खरेदी करण्यात येतील. त्यामुळे बाजारभावापेक्षा कमी दरात साहित्य उपलब्ध होईल. संबंधित कंपन्यांबरोबर तसे करार केले जातील. राज्य आणि जिल्हा सहकारी बँकांना त्यांच्या एकूण मालमत्तेच्या पाच टक्के दराने कर्जपुरवठा करण्यासही मान्यता मिळाली आहे. त्यामुळे स्वयंपुनर्विकासाच्या प्रक्रियेलाही गती मिळणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर आता ‘एनसीडीसी’कडून कर्ज स्वरूपात पैसे उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा होईल. त्यासाठी ‘एनसीडीसी’च्या उपविधींमध्ये बदलही प्रस्तावित आहेत. हे बदल झाल्यानंतर सोसायट्यांना जिल्हा बँक, राष्ट्रीय बँकांकडून कर्जपुरवठा होणार आहे.

“ नियमांमध्ये बदल करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. तसे आदेश त्यांनी सहकार खात्यालाही दिले आहेत. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही ‘एनसीडीसी’च्या उपविधींमध्ये बदल करण्यासंदर्भात पाठपुरावा करण्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार ही प्रक्रिया तातडीने पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- सुहास पटवर्धन, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ.

### सहकार विभागाकडून वित्त पुरवठ्याचे आदेश

स्वयंपुनर्विकास करू इच्छिणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना आर्थिक पुरवठा करण्याचे आदेश सहकार विभागाने जिल्हा सहकारी बँकांना दिले आहेत. तसेच, सोसायटीच्या सभासदांना मार्गदर्शन मिळण्यासाठी सहकार विभागाकडून लवकरच ऑनलाइन प्रशिक्षण सुरू करण्यात येणार आहे.

# मालमत्ता कर वसुलीचे हजार कोटींचे उद्दिष्ट

## 2024-25 या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ताकर वसुलीचे हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागामार्फत शहरातील मालमत्ता सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आले आहे. यातून ८९ हजार सहा नवीन मालमत्ताधारक जोडले गेले आहेत. त्यांना मालमत्ता कराचे अंतिम बिल प्रथमच वाटप केले आहे. यातून १६७ कोटी रुपये कराची मागणी निश्चित करण्यात आली आहे.

महानगरपालिकेने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ताकर वसुलीचे हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.




दरम्यान, आतापर्यंत ४७ हजार ४४८ मालमत्ताधारकांनी ७७ कोटी रुपये करभरणा केला आहे. त्याचबरोबर ४१ हजार ५५८ मालमत्तांधारकांकडे अद्यापही ८७ कोटींचा कर येणे बाकी आहे. ज्या मालमत्तांची चालू वर्षी नव्याने आकारणी झाली आहे, अशा मालमत्तांना बिल लागू झाल्यापासून तीन महिन्यांपर्यंत विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. आत्तापर्यंत ३० हजार ४४० मालमत्ताधारकांनी कर सवलतींचा लाभ घेतला आहे. यामध्ये ऑनलाइन स्वरुपात कर भरल्यास ५ टक्के, महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी घरास ३० टक्के, दिव्यांग व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेस ५० टक्के, झिरो वेस्ट आणि 'एसटीपी प्लान्ट' कार्यान्वित असल्यास १० टक्के, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारल्यास २ टक्के, ग्रीन बिल्डिंग रेटिंगमध्ये ३ ते ५ रेटिंग असणाऱ्या मालमत्तांना ५ ते १० टक्क्यांच्या सवलतींचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली.

### नागरिकांसाठी विशेष सुविधा

» करदात्यांना आपला कर भरण्यास सोयीचे व्हावे, यासाठी महापालिकेने करसंकलन कार्यालये व कॅश काउंटर्स २९ मार्चपर्यंत सकाळी ९.४५ ते रात्री नऊ वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. तसेच शनिवार २९ मार्च, रविवार ३० मार्च, गुढीपाडव्याच्या दिवशी व ३१ मार्च आर्थिक वर्षाचा शेवटच्या दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत (शेवटचा व्यक्ती येईपर्यंत) कॅश काउंटर्स सुरू ठेवण्याचा निर्णय करसंकलन विभागाने घेतला आहे.

“ शहरातील सर्व प्रकारच्या मालमत्तांचे मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. नवीन आकारणी झालेल्या मालमत्तांना बिलांचे वाटप करण्यात आले आहे. सदर मालमत्ताधारकाकडे तब्बल ८७ कोटींचा कर येणे बाकी असून यापैकी १८,४०८ मालमत्ताधारक सवलतीस पात्र आहेत.

- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

---

# कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील झेंडेमळ्यातील रस्त्यासाठी संरक्षण मंत्र्यांना साकडे

## खासदार श्रीरंग बारणे यांनी घेतली सरंक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत येत असलेल्या संरक्षण विभागाच्या झेडे, काळोखे, हगवणे मळा परिसरातील नागरिक रस्त्यांच्या समस्येने त्रस्त आहेत. या भागात रस्ते करण्यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाने निविदा प्रसिध्द केली आहे. मात्र, संरक्षण विभागाची कामास हरकत आहे. त्यामुळे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी थेट संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन या रस्त्याबाबत साकडे घातले आहे. यावर संपूर्ण माहिती घेऊन सदन कमांडच्या अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची ग्वाही सिंह यांनी दिली.

खासदार बारणे म्हणाले, संरक्षण विभागामुळे स्थानिक नागरिकांचे मोठे क्षेत्रफळ बाधित झाले आहे. संरक्षण विभागाची हद्द असल्याने नागरिकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील झेंडे, काळोखे, हगवणे मळा येथील एक हजार लोकसंख्या आहे. हे स्थानिक नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. ७५ वर्षांपासून तिथे रहात आहेत. सद्यस्थितीत या गावात जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. १९९० मध्ये देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने कच्चा रस्ता तयार केला होता. या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. रस्ता खराब झाल्याने या भागातील विद्यार्थी, नागरिकांना शाळा, वैद्यकीय उपचार, शेतीचे साहित्य आणण्यासाठी देहूरोड जावे लागते. रस्ता अतिशय खराब असल्याने विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने रस्ता करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. निविदा काढली आहे. मात्र, हा रस्ता संरक्षण विभागाअंतर्गत येतो. संरक्षण कायद्यानुसार प्रतिबंधित आहे. पूर्वी सैन्य अधिकाऱ्यांनी रस्त्याचा प्रस्ताव फेटाळला आहे. परंतु, रस्ता ही मूलभूत गरज आहे. रस्त्याची गरज आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने ३१ मार्च २०२३ रोजी प्रस्ताव मंजूर करून दक्षिणी कमांडला पाठविला होता. प्रस्तावित रस्त्याची लांबी १८८५ मीटर आणि रुंदी ३.५ मीटर आहे. हा रस्ता संरक्षण विभागाच्या सर्वे नंबर १६३, १६४, १६१ मधून जाणार आहे. त्यामुळे हा रस्ता निर्माण करण्यासाठी मान्यता द्यावी. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड निधी आणि खासदार, आमदारांच्या निधीतून हा रस्ता पूर्ण करेल. त्यावर सरंक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, याबाबतची संपूर्ण माहिती घेतो. त्यानुसार सदन कमांडच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील.



# 25 हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

## महावितरणकडून मोहीम सुरू : पुणे विभागात 88 कोटींची थकबाकी

**पुणे | प्रतिनिधी**

महावितरणने थकबाकी वसूल करण्यासाठी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू केली असून, पुणे परिमंडलातील २५ हजार ४३४ थकबाकीदारांचा वीजपुरवठा गेल्या २४ दिवसांत खंडित करण्यात आला आहे. घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे ८८ कोटी ४५ लाख रुपयांची थकबाकी आहे.

महावितरणची आर्थिक मदार ग्राहकांकडील वीजबिलांच्या दरमहा वसुलीवरच आहे. वीजबिलांच्या वसुलीमधून वीजखरेदीसह विविध देणी दरमहा द्यावी लागतात. त्यामुळे थकबाकी वसूल करण्यासाठी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम तीव्र करण्यात आली असून थकीत वीजबिलांचा ताबडतोब भरणा करावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.



घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीजग्राहकांकडे ४० कोटी ९ लाख रुपयांची थकबाकी आहे. गेल्या २४ दिवसांमध्ये १० हजार १७७ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तर पिंपरी-चिंचवड शहरात घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे १८ कोटी ४० लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यातील ७ हजार ७९६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तसेच ग्रामीण भागातील आंबेगाव, जुन्नर, मावळ, खेड, मुळशी, राजगड, हवेली तालुक्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे २९ कोटी ९६ लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यातील ७ हजार ४६१ ग्राहकांचा वीजपुरवठा गेल्या २४ दिवसांत खंडित करण्यात आला असल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.

मुख्य अभियंता राजेंद्र पवार परिमंडलातील विविध ठिकाणी दौरे करून शाखा कार्यालयांपर्यंत थकबाकी वसुलीचा आढावा घेत आहेत. थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित करणे व खंडित केलेल्याअवीजजोडण्यांची तपासणी करण्यासाठी अधीक्षक अभियंते युवराज जरग, सिंहाजीराव गायकवाड, रवींद्र बुंदेले यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते आणि कर्मचारी सध्या 'ऑन फिल्ड' आहेत, असेही महावितरणतर्फे सांगण्यात आले.

### घरबसल्या वीजबिल भरण्याची सुविधा

» लघुदाब वीजग्राहकांना बिलांचा घरबसल्या भरणा करण्यासाठी http://www.mahadiscom.in या वेबसाइट व मोबाइल ॲपद्वारे 'ऑनलाइन' सोय उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी थकबाकीचा त्वरित भरणा करावा आणि वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

---

# यंदा पाडव्याला आंब्याची गोड चव महागात

## सध्या रत्नागिरी आणि देवगड हापूस आंबा पंधराशे ते दोन हजार रुपये डझन दराने उपलब्ध

**पुणे | प्रतिनिधी**

लांबलेला परतीचा पाऊस, अपेक्षित थंडी नसणे आणि फेब्रुवारीपासून वाढलेले तापमान या वातावरणातील बदलाचा फटका हापूस आंब्याला बसला आहे. पहिल्या बहरातील आंब्याचा मोहोर गळून पडल्याने पिकावर परिणाम झाला असून, नेहमीच्या तुलनेत उत्पादन निम्म्याने घटले आहे. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आंब्याचा दर कमालीचा वाढला आहे. सध्या रत्नागिरी आणि देवगड हापूस आंबा पंधराशे ते दोन हजार रुपये डझन दराने उपलब्ध आहे. त्यामुळे यंदा पाडव्याला आंब्याची गोड चव महागात पडणार असून सामान्यांच्या आवाक्याबाहेरच आंबा गेला आहे.

आंब्यांच्या आगमनाची उत्सुकता उन्हाळ्याची चाहूल लागताच सर्वांना असते. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आंब्यांची आवक वाढण्यास सुरुवात होते. मार्च महिन्यात मोठी आवक होत असते. गुढी पाडव्याला आंब्याची खरेदी मोठ्या प्रमाणात होत असते. यंदा आंब्यांची आवक दर वर्षी मार्केटयार्डातील फळ बाजारात कमी प्रमाणात झाली आहे. मार्चमध्ये कोकणातून दररोज चार ते पाच हजार पेट्यांची आवक होते. सध्या रोज ७०० ते एक हजार पेटी आंब्याची आवक होत आहे. पुढील महिन्यात आंब्यांची आवक वाढेल, असा अंदाज आहे.



### पाडव्याला आंब्याचा दर, दरवर्षीपेक्षा जास्त

हवामान बदलामुळे उत्पादन घटल्याने सध्या आंब्यांची आवक कमी होत आहे.अनेक जण गुढी पाडव्याच्या अगोदर दोन ते तीन दिवस आंबा खरेदी करतात. दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी बाजार भाव जास्त मागील वर्षाच्या पाडव्याच्या दरम्यान असलेली आवक आणि या वर्षीची आवक यामध्ये लगबग ३० ते ४० टक्क्याने घट झाली आहे. मागील वर्षी प्रति डझन ५०० ते ७०० रुपये होता. तोच यावर्षी ऐन पाडव्याला एक हजार रुपयांपासून ते दोन हजार रुपये प्रति डझन ग्राहकांना घ्यावा लागत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत आंबा उत्पादन ३० ते ४० टक्क्याने घट आहे. मागील वर्षे आवक लगबग प्रति दिवस पाडव्याच्या वेळी चार ते पाच हजार पेटी येत होती. तीच आता प्रति दिवस एक हजारापासून ते तीन हजारापर्यंत पेटी येत आहे.

### असे आहेत आंब्याचे भाव

» मार्च २०२४ - ८०० ते १२०० रुपये
» मार्च २०२५ - १५०० ते २००० रुपये

> व्यापारी वर्गांना यावर्षी रत्नागिरी आंबा विकण्यास अतिशय स्पर्धात्मक कार्य करावे लागणार आहे. त्यामुळे ग्राहकांना आंबा पटवून देणे व रत्नागिरी बाजारात विकणे अतिशय कठीण जाणार आहे. सध्याचे पेटीचे बाजार ४ डझन ते ७ डझन तीन हजारापासून ते आठ हजारापर्यंत आहे. यंदा मागील वर्षीच्या तुलनेत आवक ३० टक्केनी कमी आहे. यामुळे भावात तेजीत आहेत.
>
> - युवराज काची आंबा व्यापारी मार्केटयार्ड.